'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN :2348-7143 (Online)
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3 July-Sept.- 2016

# शाहीरी वाङ्मयाचे स्वरूप व शाहीर

**प्रा. रेखा व्हि. इंगोले**
**मराठी विभाग प्रमुख**
**मा. सु. पा. कला, विज्ञान व कै. पां. ठा. वाणिज्य महाविद्यालय,**
**मानोरा जि. वाशिम. मो. नं. ९४०४५४७२७१**
**E-mail ID - rekhaingole02@gmail.com**

**मध्ययुगीन मराठी कविता विविध रूपात प्रगटली संत काव्यात तिचे स्वाभाविक, उत्स्फुर्त, ईश्वरगुण कथनाचे रूप दिसते. तर पंडिती कवितेत पांडित्य प्रदर्शना बरोबरच महाकाव्याच्या तोडीची रचना करून अभिजनरंजनाचे दुसरे रूप दिसते. मात्र शाहीर काव्यात कवितेचे खरे `मऱ्हाटी वळण` प्रत्ययाला येते. सामान्यांच्या भावभावना जनसामन्यांच्या श्ब्दातून लकबी यातून प्रकटल्या आहेत. लावणी आणि पोवाडा या दोन रचना प्रकारातून तत्कालीन महाराष्ट्राचा चेहरा मोहरा प्रकटला आहे. शृंगार आणि वीर या दोन रसांचा स्वाभाविक अविष्कार त्यातून शाहीरांनी केलेला आहे.**

लोकसाहित्यातून उगम पावलेला लावणी आणि पोवाडा असा हा वाङ्मय प्रकार आहे. पोवाडा आणि लावणी मिळून शाहीरी हा वाङमय प्रकार झालेला आहे. त्याची रचना करणाऱ्या कविलाच शाहीर म्हणतात. कालदृष्ट्या शाहीरी वाङ्मयाची व्याप्ती मराठी भाषेच्या आरंभापासून आजतागायत अशी सांगता येईल. स्थळकाळ सापेक्ष बदल स्वीकारून शाहीरी वाङ्मय आजतागायत टिकून आहे.

**शाहीरीवाङमय म्हणजे काय? :-**

पोवाडा आणि लावणी मिळून शाहीरी वाङमय प्रकार अस्तीत्वात आला आहे. पोवाडा व लावणी करणाऱ्यालाच शाहीर म्हणतात. शाहीर म्हणजे यवनी भाषेत कवी आणि शाहीरी म्हणजे काव्य खरे म्हणजे शाहीरी काव्य म्हणजे कविता लोकगीताची रचना, बांधणी स्वीकारून हा प्रकार आलेला आहे. लोकवाङ्मयात रचना काराचे नाव किंवा नाममुद्रा नसते लोकवाङ्मय अनाम असते. शाहीरी वाङ्मय प्रक्रियेत शाहीर ाचे नाव गुंफलेले असते. त्यामुळे शाहीर ांचे नाव आपल्याला कळते म्हणून शाहीरीवाङ्मय हे लोकवाङ्मय नसून लौकीक वाङमय आहे.

**शाहीरीवाङमयाचा उगम :-**

शाहीरी वाङ्मय हा लोकगीतातून उदयाला आलेला वाङमय प्रकार, लोकवाङ्मया इतकाच जुना आहे. प्राचीन वाङ्मयाचा शोध घेता नागेश सांप्रदायाचा शाहीर मन्मथाशिवलींग याची इ.स.१६०० पुर्वीची कराडच्या भवानी वरील लावणी उपलब्ध झालेली आहे. पण या मन्मथाशिवलिंगाच्या पूर्वी पोवाड्यांची रचना केली जात होती. हे चवदाव्या शतकातील अज्ञानसिध्द व बहिरापिसा विरचित्र दोन पोवाडे यादीन लेखावरून सिध्द झालेले आहे. त्यावरून शाहीरी वाङमय रचना ज्ञानेश्वरांच्या काळाच्या आसपास व्हायला लागली असावी, असे म्हणता येईल. आज आपण ज्याला शाहीरी वाङ्मय म्हणतो त्याचा प्रवाह अधिक विस्तृत आणि विविधांगी झाला तो शिवकाळ आणि नंतर उत्तरपेशवाईच्या काळात यावरून शाहीरी वाङ्मय सर्व महाराष्ट्रात निमार्ण होत होते हे समजते तसेच मराठीतील प्रारंभीच्या मौखीक लोकवाङ्मयाबरोबर शाहीरीवाङमयाचा उगमा झाला असे म्हणावे लागेल.

**पोवाडा आणि लावणी :-**

शाहीरी वाङ्मयातील 'पोवाडा' हा रचना प्रकार रचनेच्या दृष्टीने दीर्घ असतो. त्याची मांडणी चौक व चौकनी केलेली असते. पोवाड्याची रचना ही गद्यपद्यात्मक असते. आपणाला पोवाडा म्हणजे रचना मिळते तो पोवाड्याचा

पद्यभाग असतो. प्रत्यक्ष पोवाडा सादर करीत असतांना शाहीर आपण कोणत्या स्थळी कोणत्या लोकसमूहासमोर पोवाडा सादर करणार आहोत याचे भान ठेवून प्रसंग ओळखून गद्यभाग रचित असतो. पोवाडा हे एक प्रकारचे नाटक आहे. ते केवळ श्राव्य काव्य नव्हे तर ते दृश्य काव्यही आहे. पोवाड्यामध्ये वीरमरणाच्या साहित्याचे वर्णन असते. त्यात जयगान, समर प्रसंगाचे वर्णन असते. पोवाडे चारणगीता प्रमाणे पारंपारिक गीतांच्या (लोकगीतांच्या) कक्षेत सामावत नाहीत. लोकजागृती हे पोवाड्याचे उद्दिष्ट असते. प्रसंगी ग्रामीण असते. तरी ते साहित्य परंपरेत विलीन झालेले आहे. शाहीर हे त्याकाळचे वृत्तपत्रकार व इतिहास लेखक होते. असेही एक वैशिष्ट्य सांगितले जाते. पोवाडा रचना ही निवेदनपर असते ती गद्यपद्य मिश्रीत असते. वीरपुरूष, देवस्तुती, धार्मिक, सामाजिक आदि महत्त्वाचे प्रसंग पोवाड्याचे विषय होऊ शकतात.

**लावणी :-**

पोवाड्याच्या मानाने लावणी आकाराने लहान असते. तिच्यात निवेदनापेक्षा भावना अविष्काराला प्राधान्य असते हा भावनाविष्कार स्थूल, भडक, बटबटीत स्वरूपाचा असतो. ती नृत्य, नाट्य, अभिनय संगीत आदि अंगानी सादर केली जाते. त्यामुळे अधिक आकर्षक हृदय ठरते. त्यात अधिक भर म्हणजे लावणीत दिसणारी मराठमोळ्या वळणाची खास महाराष्ट्रीय वेश परिधान केलेली नायिका.

**झुलत डुलत डौलात कमर हलवित नखऱ्याने |**
**ठुमक चाल चौरंगी खबुतर झडपी कुऱ्याने ||**

शृंगार, कौटूंबिक जीवन भक्ती, अध्यात्म, सामाजिक वैराग्य, उपदेश आदि विषयावंर लावणी लिहीली जाऊ शकते. भाव कवितेला जसा कोणताही विषय वर्ज्य नाही तसा लावणीला कोणताही विषय वर्ज्य नाही. लावणी ही ताल ठेक्यात म्हणता येणारी भावगीता सारखी रचना आहे. सर्व सामान्य लोकांनाही कविता या संकल्पनेला वापरलेला शब्द म्हणले लावणी.

मनोरंजनाची गरज ही प्रत्येक समाजाची आवश्यक गरज असते त्यातून रंजनप्रधान साहित्य निमार्ण होते. जनसमुदायाचे मनोरंजन करमणुक यातुन लावणी पुढे आली यात आध्यात्मिक व लौकीकता यांचे मिश्रण झालेले दिसते. लावणीची रचना लोकगीत सदृश्य असलेली दिसते. सांस्कृतीक परंपरा रीती, संकेत, आदर्श या बाबी लावणीतून प्रकट होतात. लावणीचे लोकगीताशी जवळचे नाते दिसते पण तरीही लावणीला लोकगीत म्हणता येणार नाही. अभिजात वाङमय आणि लोकगीत यांच्यामधील दुवा म्हणजे लावणी होय. लावणी हा काव्यप्रकार पेशवाईत बहरला असला, तरी त्याचे आंतरिक नाते संत वाङमयामधील गौळणी विरहिणीमध्ये असल्याचे आढळते संतवाङमयातील आध्यात्मिक वारसा लोकगीत सरणीतील स्वाभाविक छेद व गेयता पौराणिक कथा आख्याने व लौकिक जीवनधर्म यांचे सहज सुंदर रसायन म्हणजे लावणी होय.

**प्रमुख शाहीर :-**

शाहीरी वाङमय सर्व अंगानी भरभराटीस आणणारे हे शाहीर त्यांच्या वाङमयात शाहीरीवाङमयाची सर्व वैशिष्टे आढळतात. तसेच ह्या शाहीर ंनी पेशवे दरबारात हजेरी लावली परशराम (नाशिक) होनाजी (पूणे) रामजोशी (सोलापूर) प्रभाकर (हर्वी,कोकण) सगनभाऊ (पूणे परिसर) अनंत फंदी (संगमनेर नगर) असे हे शाहीर महाराष्ट्राच्या बव्हंशी भागांचे प्रतिनिधीत्व करतात तसेच या शाहीर ंत सर्व जाती धर्माच्या लोकांचा समावेश होतो.

**राम जोशी :-**

शाहीर आणि कीर्तनकार म्हणून रामजोशींची ख्याती आहे. हे मूळचे सोलापुरचे संस्कृतचे व्यासंगी. पित्याच्या निधनानंतर पंढरपूर येथे त्यांनी वास्तव्य केले या काळात संस्कृत नाटके, व्याकरण, काव्य यांचा अभ्यास केला.

मोरोपतांनी त्यांची 'कविकार' म्हणून स्तुती केली. राम जोशी यांनी 'मदालसा चंपू' व 'रामाष्टक स्त्रोत्र' अशी संस्कृत काव्यरचना केली. शब्दावर प्रभुत्व असा ज्याने त्यांच्या लावणी रचनेला सौंदर्य प्राप्त झाले. राम जोशींनी लिहिलेल्या लावण्या बहारदार खटकेबाज व गेय आहेत. १३३ लावण्यांचा संग्रह आज उपलब्ध आहे. त्यांच्या लावण्याचे तीन प्रकारे वर्गीकरण करण्यात येते. पहिल्या प्रकारात देवतावर्णनपर लावण्या, दुसऱ्या उपदेशपर व तिसऱ्या शृंगारीक लावण्या.

**उपदेशपर लावणी** :-

उपदेशपर लावणीत आध्यात्मिक उपदेश तसेच परमार्थ प्रवण करणाऱ्या या लावण्या पंडितकाव्याच तोडीच्या आहेत.

**"ही बार बार तलवार येईल काय पुन्हा|**
**या दुर्लभ नर देहात ठेविशी कुणा |**
**भगवंत भुकेला भक्तीचा पाहुना |**
**वर्म कळेना, धर्म घडेना, कर्म चित्तम व्दिधा**
**सदाहरि कविरायांवर फिदा|"**

अशी परमार्थपर लावणी तो लिहितो.

**शृंगारिक लावण्या :-**

राम जोशी यांच्या शृंगारीक लावण्यात

**"सुंदरा मनामध्ये भरली | जरा नाही ठरली |**
**हवेलीत शिरली, शिरी मोत्याचा भांग-कुणाची सांग?|"**

अशी चपखल उडत्या चालीची रचना आढळते तशीच

**"सांग सखे सुंदरी कोण्या ग मदनाचि मंजिरी,**
**हिच्या सौदर्यांची सिमा | झाली गडे रतिहुनि अतिउत्तमा**
**अमा गमती पौर्णिमा|"**
**"मज वाटली विद्युन्नटी, भली गं रूपाची उतरली भटी |**
**पाहूनि कृशातव कटी, हरिचा कृशी कटिमद लटपटी |"**

राम जोशींनी चालवलेली ही मदन तलवार अनेकांना घायाळ करून गेली एकूनच शृंगार, अध्यात्म, वास्तव वर्णन अशा तिहेरी लावण्या लिहीणारा हा लावणीकार मराठी वङमयात मानाचा तुरा खोवुन गेला.

**होनाजी बाळा :-**

होनाजी आणि त्याचा मित्र बाळा बहिरू अशा जोडनावांनी हा कवनकार प्रसिध्द आहे. याचे आडनांव शेलारखाने पिढीजात शाहीरीअसल्याने हा कवने करण्यात तरबेज होता. रागवारीवर या लावण्या सादर केलेल्या आहेत. त्याच्या नावावर २५० लावण्या आहेत. काही पोवाडेही त्याने रचले. नुकत्याच प्रसिध्द झालेल्या 'अंधारातील लावण्या' या संग्रहात त्यांच्या ७७ नव्या लावण्यांची भर पडली आहे. होनाजींनी रचलेल्या पोवाड्यांची संख्या चारपाच भरेल त्यापैकी 'रंगाचा पोवाडा' व खर्ड्याच्या लढाईचा पोवाडा' हे दोन पोवाडे सवाई माधवरावांच्या कारकीर्दीवर आहेत.

कृष्णाच्या बाळलीलापर लावण्यात 'घनश्याम सुंदरा' ही त्यांची लावणी खरोखरच अमर आहे. होनाजींच्या रचनेत काव्यप्रसाद हा गुण सर्वत्र असून ह्या भूपाळीतही तो सर्वत्र आहे तसेच ती प्रसिध्द होण्याचे कारण त्याच्यामधील

शब्दरचना व रसनिर्मितीचे सामर्थ्य होय. कवी होनाजी बाळा यांनी आपल्या लावण्यामधून अनेक देवदेवतांना वंदन केले आहे. तसेच पौराणिक प्रसंगही चित्रित केले आहेत. कृष्णचरित्रातील प्रसंग त्यांना विषेश प्रिय आहेत.

‘सांगा मुकुंद कुणी हा पाहिला’ या लावणीत आम्ही विषयकारी असल्याने कृष्ण कळला नाही आता मात्र भक्तांच्या भूमिकेत कृष्ण उमगला असे राधा म्हणते.

**“राधा हरिस पुसती, नेत्र विलसती, लाल भासती**
**उघड दिसती दृष्ट धुर्मिती**
**सांगा मजला श्रीपती काल तुम्ही रात्र कुठे क्रमिली”**

ही लावणी सूचक आहे.याच प्रमाणे त्यांच्या काव्यात स्त्री सौंदर्य कलात्मकता आहे.

**"लटपट लटपट तुझे चालणे मोठ्या नखऱ्याचे |**
**बोलणे मंजुळ मैनेचे ||”**

या दोनच ओळीत होनांजींनी त्या स्त्रीचे जिवंत चित्र आपणापुढे उभे केले आहे.

**“जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी**
**झडप घावुन प्राण देतो दीपकाचे वरी”**
**“तुझ्या प्रीतीचे दु:ख मला दाऊ नको रे**
**वधुनी जायी प्राण घेई दाऊ नको रे ”**

या सारख्या ओळी वाचतांना आधुनिक मराठी काव्यातील ओळी असाव्यात असे वाटते. होनांजींच्या काव्यात स्त्री मनाचे विविध विभ्रम प्रकटले आहेत. स्त्री शरीराप्रमाणेच तिच्या मनोव्यथेचे आर्ततेचे सुंदर चित्रण त्याने केले आहे. प्रेमाची भाषा एखाद्या रोमँटिक सौंदर्यवादी कवी प्रमाणेच भासेत. काव्यात्मक, प्रत्ययकारिता, सुक्ष्म अवलोकन, नेमके नेटके हृदयचित्रण ही त्याच्या काव्याची वैशिष्ट्ये म्हणता येईल.

**सगन भाऊ :-**

सगनभाऊ मुस्लिम धर्मीय होता तो तलवारीला धार लावायचा ‘तलवारीच्या धारेला पाणी देणाऱ्या या शाहीर ाचे तुणतुणाच्या तारेवरील चातुर्य ही वाखानण्या सारखे होते’ असे मत सारस्वतकारांनी व्यक्त केले आहे. याची सांगड त्याने आपल्या कवनात घातलेली दिसते. अनंत फंदीपासून शृंगाराला भरती येत होती. सगनभाऊच्या काळी रशिकतेने मर्यादा ओलांडली. बीभत्स, अश्लील आडपडदा न ठेवता लावणीकार सर्व वर्णन करू लागले. सगनभाऊनेही शृंगारिक लावण्या रचल्या स्वतंत्र्य विचार उत्तम शृंगार कल्पन व डौलिदार रचना, बैठकीच्या चाली, यामुळे सगनभाऊच्या लावण्या लोकप्रीय झाल्या. सगनभाऊंनी आपल्या लावण्यांमधून विविध स्त्रीरूपे साकार केली आहेत. मऱ्हाटमोळी स्त्री तिच्या रूप यौवनासह दाग-दागीन्यांसह व खास नखऱ्यासह तो उभी करतो.

**नाकी नथ हालती नागिन डुलती शृंगाराचा काय नखरा**
**किंवा**
**लाल भडक वेणी सडक आति चमेलीमधे भिजली**

असे तो वर्णन करतो. ‘गोरे गाल मजा पहाल जपुन चाल फाकडे’ सारखी लावणी कृषि संदर्भ देत शृंगारानुभव प्रकट करते. सगनभाऊंनी आपल्या कवनातून तत्कालीन राजकीय, सामाजिक जीवनाचे चीत्र रेखाटले आहे. सगनभाऊचे

पोवाडे त्याच दृष्टीने वाचण्या सारखरे आहेत. त्यांचा 'पानपतचा पोवाडा' उल्लेखनीय आहे. या पोवाड्यात पेशव्यांचे सैन्य वर्णन त्यांच्या हालचाली, प्रत्यक्ष लढाई त्यानंतर झालेली वाताहत याचे धावते व चीत्रदर्शन वर्णन केलेले आहे.

**भाऊ नाना तलवार धरून गेले गिलच्यावर चढाई वरून**

असा प्रारंभ करून 'गिलच्यांनी हिकयैत करून भाऊ वेढीला बहुयुक्तीने' असे निवेदन 'झांगड नौबती वाजती दणादणभर संगीत असे युध्द प्रसंगीचे वर्णन तो करतो.

**सोकला कंठ मग पाणी पाणी बोलती**
**जखमांची नाही गणती | कबंध नाचती ||**

एवढेच नव्हे तर हे दृश्य पाहून आकाशातील चंद्रसूर्यही झाकून गेले सर्वत्र अंधार पडला असे कवी लिहितो. लोकरंगभूमीवर सादर होणारा हा नाट्यविष्कारच आहे. सगन भाऊंची शाहीरीही भावनेची उत्कटता असल्यामुळे भाषा कशी अर्थवाही होते हे यातून प्रत्ययाला येते.

**अनंत फंदी :-**

अनंत फंदी हे संगमनेर येथील रहिवासी भवानी बुवाच्या आर्शीवादाने व थोड्या प्रयत्नाने ते चांगल्या रचना करू लागले. सवाई माधवांवर 'माधव निधान' नावाचे काव्य त्यांनी लिहिले त्यांचे आज सात पोवाडे व पंचवीस तीसहून अधिक लावण्या उपलब्ध आहेत. अनंत फंदीचे शाहीरी वाङ्मयातील स्थान वर्णन करतांना होनाजींचे 'फंदी अनंत कवनांचा सागर' असे म्हटले आहे. फंदीच्या भाषेत प्रवाहीपणा व गोडवा फारसा नाही. फंदीची सामाजिक जाणीव मात्र अधिक जागरूक आहे. 'लंडे गुंडे हिरसे तट्ट' हा कटाव म्हणजे व्यवहार ज्ञानाच्या उपदेशाचा एक संच आहे. फटक्यांची रचना करण्यात अनंत फंदी वाक्बगार आहेत.

**शाहीर प्रभाकर :-**

संपूर्ण नाव प्रभाकर जनार्दन दातार त्यांचे तेरा चौदा पोवाडे व पावणे दोनशेहून अधिक लावण्या आहेत. प्रभाकरांनी लावणी करावी व गंगु हैबती व महादबा सुतार यांनी ती म्हणावी. विश्वासनीय सुसंगत इतिहास आणि सुंदर शैली या दृष्टीने प्रभाकराचे पोवाडे इतर सर्व शाहीर ंहून सकस आहेत. रसांचा गाढपणा आणि भाषेचे प्रौढ, नाजुक, प्रसादपूर्व परंतु तितकेच ललित स्वरूप हे प्रभाकरांचे विषेश आहेत.
खर्ड्याची लढाई देखील त्याने पोवाड्यातून त्यातील धुमचक्रीसह साकारली आहे.

**"अठरा घटका लाही फुटली | तोफ हजारो हजार सुटली ||**
**मिरजकारांची मंडळी झटती | भाऊ बरोबर तिसंग तुटली |**
**मोगल सेना मागे हटली | त्या समयी कैकांची उपटली |**
**पेढाऱ्यांनी दौलत लुटली | गबर झाले एका दिसांत ||"**

त्याकाळात पोवाडा रचनेमुळे ते अतिशय प्रिय झाले.

**निष्कर्ष :-**

शाहीरी वाङ्मयाला 'मराठी काव्याची प्रभात' असे अच्युत बळवंत कोल्हटकरांनी संबोधले आहे. प्राचीन कवी हे कवी नव्हते तर ते श्रेष्ठ तत्वज्ञानी होते. शाहीरी काव्य हे मराठी साहित्याचा इतिहासात अगदी स्वतंत्र वळणाचे काव्य आहे. त्याची प्रेरणा स्वतंत्र व अविष्कार नाविण्यपूर्ण आहे. मराठी राज्याची चढती उतरती कळा त्यात प्रतिबिंबीत झाली आहे. शाहीरी काव्य महाराष्ट्राच्या राजकिय व सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आहे. म्हणूनच ते मराठी शाहीच्या

उदयाबरोबर उदयाला आले व मराठीशाही विलयाला गेल्यानंतर तेही अर्तंधान पावले. शाहीरी वाङ्मय हे लौकीक वाङमय आहे. शाहीरी कविंच्या प्रतिमेस काही मर्यादा पडलेल्या होत्या. त्यामुळे तत्कालीन जीवनाची संपूर्ण कल्पना शाहीरी काव्यात येत नाही जीवनाच्या काही विशिष्ट अंगाचाच प्रत्यय येतो तोही काहीशी भडक स्वरूपात, अतिशोयोक्ती कल्पना विलास, दंतकथा इत्यादी अनेक गोष्टीमुळे जीवनाचे यथार्थ दर्शन घडणे त्यातून कठिण जाते.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१. मराठी शाहीर ंची पंरपरा - धोंड म. वा.
२. मराठी लावणी - धोंड म.वा.
३. मराठी शाहीरी वाङमय - सहस्त्रबुध्दे म.न.
४. केळकर य.न. - तंत्र कवी तथा शाहीर चिन्मय प्रकाशन औरंगाबाद
५. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - डॉ. विद्यासागर पांटगणकर
६. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास - प्राचीन काळ - प्र.न. जोशी स्नेहवर्धन प्रकाशन पूणे.